एल.ए.आर.नं. ६५/२००५
दामोधर वि. महा. शासन
निशाणी क्र. ३१

अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ दिपक दामोधर शिवनकर,

**<u>सरतपास अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.एम.कुशवाह यांच्यातर्फे शपथेवर सुरु-</u>**

माझ्या शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे आणि तो मला समजावून सांगण्यात आला आहे. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आमुख्त्यार पत्र, सातबारा उतारा, आठ-अ उतारा, तसेच अवार्डची प्रत इत्यादी दस्त दाखल केले आहे. त्या दस्तांना अनुक्रमे नि.३२, ३३ ३४ आणि ३५ देण्यात येत आहे.

<u>सरतपास पुर्ण.</u>

**<u>उलटतपास गैरअर्जदार क्र. १ आणि ४ तर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. मोहरिल यांद्वारे -</u>**

३. शेतजमिन पुर्वी माझीच होती. पुर्वी मी सोयाबिनचे पिक घेत होता. हे म्हणणे खरे नाही की माझ्या शेतीला जलसिंचनाची सोय नाही. माझ्या शेतीला कॅनलने पाणी येत होते. त्यासाठी जलसिंचन विभागाला आम्ही पैसे देत होतो. या प्रकरणात त्याबाबतची पावती दाखल केलेली नाही.

४. माझ्या शेतामध्ये जाण्यासाठी, माझ्या काकाच्या शेतामधून जावे लागते. माझा काकाच्या शेतीच्या पलीकडे मुख्य रस्ता आहे. सदर रस्ता डुमरी रोड आहे. नांदगाव येथे जाण्यासाठी, डुमरी फाट्यावरुन, नागपूर जबलपूर हायवे वरुन जावे लागते. साक्षीदार स्वतः सांगतो की, दिड कि.मी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, अडिच कि. मी अंतर आहे. मी डुमरी स्टेशन येथे राहतो. मी नांदगाव येथील राहणा-या लोकांना ओळखतो. मी मोतीराम भोतमांगे यांना ओळखतो. हे मला माहित नाही की, भोतमांगे यांनी त्यांची जमीन सिमा उरकुडे, वर्षा उरकुडे यांना विकली होती. हे मला माहिती नाही की, त्यांची जमीन देखील संपादीत झाली आहे. त्यांनी, जास्त पैसे मिळवे म्हणून अर्ज

केल्याचे मला माहित नाही. डुमरी फाटा हा नागपूर पासून ३० कि.मी अंतरावर आहे. हे म्हणने खरे आहे की, शेत जमीनी नंतर वनविभागाची जमीन सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन ही कोरडवाहू होती आणि सदर जमीनीची किंमत ८० हजार प्रती हेक्टर पेशा जास्त नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या अर्जामध्ये आवास्तव, कोणत्याही आधारा शिवाय मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की जास्त पैसे मिळण्याच्या हेतुने खोटा अर्ज केला नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

L.A.R. No. 106-2005

SARODE SANDEEP MARUTI

Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.02.11 16:52:33 +0530

दिनांक ११/०२/२०२६
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)